जा.क्र.प्राआके/कसाल/एनएचएम/दरपत्रकमागणी/ 117 /2026
प्राथमिक आरोग्य केंद्र कसाल
तालुका कुडाळ, जि.सिंधुदुर्ग
दि. 08/06/2026

# दरपत्रक मागणी

प्राथमिक आरोग्य केंद्र कसाल अंतर्गत सन 2026-2027 या आर्थिक वर्षामध्ये होणा-या विविध शासकिय कार्यक्रम, प्रशिक्षण, आढावा सभा इ.करीता जेवण,नाष्टा उपलब्ध करुन देणेकरीता खालील नमुन्यात बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | वर्णन /प्रमाण | दर रुपये |
|---|---|---|---|
| 01 | चहा साधा | 75 मि.ली. | |
| 02 | चहा स्पेशल | 75 मि.ली. | |
| 03 | अल्पोपहार<br>शिरा गोड/उपिट/कांदा पोहे/ समोसा/ वडापाव/साबू वडा/साबू खिचडी/इडली चटणी/ इडली सांबार/पाव भाजी/आंबोळी चटणी/मिसळ/मेंदू वडा/दहीवडा | 150 ग्रॅम ते 200 ग्रॅम | |
| 04 | शाकाहारी साधे जेवण (मर्यादित) | 3 चपात्या, दोन मुद भात,प्रत्येकी 1 वाटी वरण,पातळ भाजी,सुकी भाजी,सोलकडी किंवा दही,पापड, लोणचे,कोशिंबिर | |
| 05 | शाकाहारी जेवण साधे (अमर्यादित) | चपात्या,भात, वरण,पातळ भाजी, सुकी भाजी,सोलकडी, किंवा दही,पापड, लोणचे, कोशिंबिर, खाईल तेवढे | |
| 06 | शाहाकारी स्पेशल जेवण (मर्यादित) | 3 चपात्या / 5 पुऱ्या,दोन मुद मसाला भात,प्रत्येकी 1 वाटी वरण,पातळ भाजी,सुकी भाजी, सोलकडी, किंवा दही,पापड, लोणचे, कोशिंबिर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम/श्रीखंड/बासुंदी/जिलेबी/रस मलाई/ रस गुल्ले | |
| 07 | शाकाहारी स्पेशल जेवण (अमर्यादित) | चपात्या/ पुऱ्या, मसाला भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबिर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम/श्रीखंड/बासुंदी/जिलेबी/रस मलाई/रस गुल्ले खाईल तेवढे | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 08 | चिकन बिर्याणी | पाव किलो | |
| 09 | चिकन जेवण (मर्यादित) | 3 पुरी, दोन मुद भात, सुके चिकन 01 वाटी, चिकन रस्सा, गरजेनुसार,सोलकडी, कोशिंबिर, लिंबू इत्यादी | |
| 10 | चिकन जेवण (अमार्यादित) | पुरी, भात, सुके चिकन, चिकन रस्सा,गरजेनुसार,सोलकडी, कोशिंबिर, लिंबू इत्यादी | |
| 11 | व्हेज पुलाव | पाव किलो | |

इच्छूक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 7 दिवसांपर्यंत म्हणजेच दि. 15/06/2026 रोजी पर्यंत दुपारी 03.00 वाजेपर्यंत विहित नमुन्यात परिपुर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करून अटी व शर्ती पुर्ण झालेली दरपत्रके त्याच दिवशी किंवा पुढील दिवशी कार्यालयीन वेळेत खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकाला पुरवठा आदेश देणेत येईल.

वैद्यकिय अधिकारी (गट-अ)
प्राथमिक आरोग्य केंद्र कसाल
वैद्यकिय अधिकारी (गट-अ)
प्राथमिक आरोग्य केंद्र कसाल,
तालुका-कुडाळ,जि.सिंधुदुर्ग

<u>दरपत्रक अटी व शर्ती</u>

1) अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी इत्यादी याची व्यवस्था पुरवठादारानेच करावयाची आहेत. तसेच जेवण /नाष्टयानंतरची त्या ठिकाणची साफसफाई पुरवठादाराने करावयाची आहे.
2) आमच्याकडून अन्न तयार करण्यासाठी जागा किंवा पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.
3) सर्व अन्नपदार्थांचा दर्जा व चव उत्तम असावी, तसेच सर्व पदार्थ ताजे असणे बंधनकारक आहे.
4) कोणतीही एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजुर अथवा नामंजुर करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीत यानी राखून ठेवले आहेत.
5) प्रत्येक कार्यक्रमापुर्वी 1 किंवा 2 दिवस आगावू कल्पना दिली जाईल त्यानुसार व्यवस्था करावयाची आहे.
6) जेवण/चहा/नाष्टयाचे देयक रक्कम स्पर्श प्रणाली /त्यावेळी उपलब्ध वित्तीय नियमानुसार संबंधित पुरवठादाराच्या खातेवर जमा केली जाईल.
7) ठरवून दिलेल्या वेळेत खादय पदार्थ दरपत्रकात नमुद वर्णनानुसार व दरानुसार देणे आवश्यक आहे.
8) पुरवठादाराने दरपत्रक देतेवेळी कोणतीही अट घालावयाची नाही.
9) ज्या पुरवठादाराची दरपत्रक मंजुर केले आहे त्यांनी वरील सर्व अटींचे पालन न केल्यास कोणतीही सुचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

10)सदरची दरपत्रके सन 2026-2027 या आर्थिक वर्षासाठी रक्कम रुपये 200000 पर्यंतच्या पुरवठा आदेशापर्यंत बंधनकारक राहतील. तसेच चहा जेवण नाष्टा यांचे अंदाजित वार्षिक मागणी रक्कम रुपये 200000/- पर्यंत असेल. मार्च 2027 पुर्वी सदरची आर्थिक मर्यादा संपल्यास सदरचा दरकरार आपोआप रदद होईल. त्यानंतर सदर मक्ता वाढवून देणेबाबत अथवा नविन दर करार करणेबाबतचा अधिकार खाली सही करणार यांचेकडे असेल.

11)जेवणाची तसेच चहा, नाष्टा,यांची एक वेळची ऑडर किमान असेल 30 नगपेक्षा कमी असलेल्या तसेच रक्कम 5000/- पेक्षा कमी रक्कमेची ऑडर असेल. तसेच जेवण/चहा/नाष्टा ची ऑडर देणे अथवा न देणेचा अधिकार वैदयकिय अधिकारी,गट-अ, प्राथमिक आरोग्य केंद्र कसाल यांचा राहील.

12) दरपत्रक सादर करणा-या मक्तेदारांनी आपल्या दुकान/संस्था/ नोंदणी दाखला (उदा.नगरपरिषद /ग्रामपंचायत नोंदणी अथवा जीएसटी नोंदणी दाखला) तसेच नोंदणी पत्रकावर नमुद मालकाचा पॅन कार्ड अथवा संस्थेच्या पॅन कार्ड ची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झाले चे तारखेपासून 8 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.

दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण

1.w.w.w.nrhm.maharashtra.gov.in

2.w.w.w.arogya.maharashtra.gov.in

3. तालुका आरोग्य अधिकारी कुडाळ यांचे कार्यालयीन नोटीस बोर्ड वर.

4.प्राथमिक अरोग्य कसाल यांचे नोटीस बोर्ड वर.

वैद्यकिय अधिकारी (गट-अ)
प्राथमिक आरोग्य केंद्र कसाल

Scanned with OKEN Scanner